# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

## दिनांक:04.02.2026 वार:बुधवार

---

1. अमेरिकेनं भारतीय उत्पादनांवरील आयातशुल्क कमी केल्याच्या घटनेचं सर्वच क्षेत्रातून स्वागत
2. लोकसभेत बेशिस्त वर्तन केल्याबद्दल विरोधी पक्षाच्या आठ खासदारांचं निलंबन
3. मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गावरच्या महाराष्ट्रातल्या दुसऱ्या बोगद्याचं काम पूर्ण आणि
4. 19 वर्षाखालील मुलांच्या निर्धारित षटकांच्या विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात आज उपांत्य सामना

**भारत-अमेरिका करार-मुख्यमंत्री**

अमेरिकेनं भारतीय उत्पादनांवरच्या आयात शुल्कात घट केल्याचं काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरील संदेशातून सांगितलं. तत्काळ प्रभावानं हे आयातशुल्क 25 टक्क्यांऐवजी 18 टक्के केलं जाणार आहे. तसंच भारत अमेरिका यांच्यातल्या महत्त्वपूर्ण व्यापार करारावरही दोन्ही देशांची सहमती झाली. या घटनेचं काल उद्योग क्षेत्रासह विविध स्तरातून स्वागत करण्यात आलं.

भारत-अमेरिका व्यापार करार हा भारताचं भवितव्य सुनिश्चित करणारा करार असून, यामुळे प्रत्येक भारतीयाचं हित साधलं जाईल, असा विश्वास केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत व्यक्त केला. या करारामुळे भारताचं जागतिक अर्थव्यवस्थेतलं स्थान पक्कं होईल. या कराराचा कृषी, दुग्धविकास, पशुपालन आदी क्षेत्रांना फायदा होणार आहे, असं त्यांनी सांगितलं.
अन्य केंद्रिय मंत्र्यांनीही या कराराचं स्वागत केलं आहे.

व्यापारी आणि उद्योजक संघटनांनीदेखील या कराराचं स्वागत केलं असून यामुळे दोन्ही देशांमधील आर्थिक भागीदारीला बळ मिळेल असा विश्वास व्यक्त केला.

भारत-अमेरिका व्यापार कराराच्या घोषणेमुळे शेअर बाजारात काल तेजी दिसून आली. मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात 2 हजार 73 अंकांची तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीत 639 अंकांची वाढ झाली.

**संसद कामकाज**

लोकसभेत काल राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा चीनचा मुद्द उपस्थित केला; त्यानंतर झालेल्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज तहकूब करण्यात आलं. कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर युरोपियन महासंघ आणि अमेरिकेशी झालेल्या कराराच्या मुद्द्यावरून गोंधळ झाला. यावेळी विरोधी पक्षाच्या काही सदस्यांनी सभापतींच्या आसनाच्या दिशेने कागद भिरकावले. या सदस्यांच्या विरोधात, केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी मांडलेला निलंबन प्रस्ताव आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला.
लोकसभेत बेशिस्त वर्तन केल्याबद्दल विरोधी पक्षाच्या आठ खासदारांना अधिवेशनाच्या उर्वरित काळासाठी निलंबित करण्यात आलं. यात काँग्रेसच्या सात तर माकपच्या एका खासदाराचा समावेश आहे.

**वैष्णव-बोगदा**

मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गावरच्या दुसऱ्या बोगद्याचं काम पूर्ण झाल्याची घोषणा केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल केली. महाराष्ट्रात पालघर जिल्ह्यातील जामशेत इथं बांधलेला हा बोगदा 4 शे 54 मीटर लांब आणि सुमारे 15 मीटर रुंद आहे. न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग पद्धतीने या बोगद्याचं काम करण्यात आलं आहे. हे काम वेगानं पूर्ण केल्याबद्दल बोगद्याच्या बांधकामात सहभागी सर्व यंत्रणांची वैष्णव यांनी प्रशंसा केली आहे. एक महिन्यांपूर्वी पालघर जिल्ह्यातल्या पहिल्या बोगद्याचं काम पूर्ण झालं होतं. आतापर्यन्त 334 किलोमीटरचा लोहमार्ग आणि 417 घाट आणि पूलांचं काम पूर्ण झाल्याची माहितीही वैष्णव यांनी दिली.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सहा दिवसांच्या आपल्या ओडिशा दौऱ्यात आज पुरी इथल्या भगवान जगन्नाथ मंदिराला भेट दिली. राष्ट्रपतींच्या दौऱ्यामुळे मंदिरात चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून सुरक्षेच्या कारणासाठी आज सकाळी 10 वाजेपर्यंत सामान्य नागरिकांसाठी दर्शन बंद ठेवण्यात आलं आहे.

**रिझर्व्ह बँक**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची तीन दिवसांची बैठक आजपासून सुरू होईल. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या नेतृत्वातील सहा सदस्यांची समिती येत्या शुक्रवारी पतधोरण जाहीर करेल. बँकेनं गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात रेपो दरात कपात करुन तो 5 पूर्णांक 25 शतांश टक्के केला होता.

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या शुक्रवारी परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. समाज माध्यमावीरल संदेशाद्वारे पंतप्रधानांनी या कार्यक्रमाची माहिती दिली. या संदेशात त्यांनी तणावमुक्त वातावरणात परीक्षा होण्याचं महत्त्व तसंच मनाची शांतता, आत्मविश्वास वाढवणं आणि आव्हानांवर मात करणं यासाठीचे उपाय सांगितले आहेत. यावर्षी देवमोगरा, कोइमतूर, रायपूर, गुवाहाटी आणि नवी दिल्लीतल्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांसोबत चर्चा केल्याची माहिती पंतप्रधानांनी दिली आहे.

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल अमेरिकेचे वित्त सचिव स्कॉट बेसेंट यांची भेट घेतली. भारत अमेरिका आर्थिक भागीदारी तसंच सहकार्य वाढवण्याबाबत या भेटीत चर्चा झाल्याची माहिती जयशंकर यांनी समाज माध्यमावरील संदेशाद्वारे दिली आहे. आज जयशंकर अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबिओ यांना भेटणार आहेत. रुबिओ यांच्या अध्यक्षतेखाली दुर्मिळ खनिज मंत्रीस्तरीय परिषद होणार असून परिषदेच्या उद्घाटन सत्रात अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स आणि अन्य वरीष्ठ अधिकारी तसंच 50 देशांची शिष्टमंडळं सहभागी होतील.

**अमेरिका**

अमेरिकेतील अंशतः सरकारी टाळेबंदी संपुष्टात आणण्यासाठी तिथल्या प्रतिनिधीगृहानं एक पूर्णांक दोन ट्रिलियन अमेरिकी डॉलर्स खर्चाला मंजूरी दिली आहे. 217 विरुद्ध 214 मतांनी हा प्रस्ताव मंजूर झाला. अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या प्रस्तावावर स्वाक्षरी केल्यानंतर गेल्या शनिवारपासून लागू झालेली अंशतः टाळेबंदी संपेल.

**नड्डा-मार्गदर्शक सूचना**

आजच्या जागतिक कर्करोग दिनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रिय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जेपी नड्डा यांनी फुफ्फुसाच्या कर्करोगावरील उपचार आणि देखभाल याबाबतच्या मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या सूचनांची देशभरात उपचारांचं प्रमाणीकरण करण्यात, निर्णय क्षमता वाढवण्यात आणि रुग्णकेंद्रिय कर्करोग उपचारांसाठी मदत मिळेल असं नड्डा काल नवी दिल्लीत झालेल्या कार्यक्रमात म्हणाले. उपचार आणि देखभालीसाठीच्या या पुरावा आधारित मार्गदर्शक सूचनांमुळे देशभरातील रुग्णालयांना उच्च दर्जाचे आणि प्रमाणित उपचार करणं शक्य होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**लष्कर सराव**

भारत आणि किरगिझस्तान यांच्यातला संयुक्त लष्करी सराव खंजर आजपासून आसाममधे सुरू होत आहे. या सरावामुळे दोन्ही देशातील लष्करी भागीदारी मजबूत होईल तसंच द्विपक्षीय संरक्षण सहकार्य वृद्धींगत होईल. हा सराव येत्या 17 तारखेपर्यंत सुरू राहणार असून दोन्ही देशांच्या विशेष दलांच्या अंतर्गत सहकार्यावर यामध्ये भर दिला जाणार आहे.

**नेमबाजी**

आशियाई अजिंक्यपद रायफल,पिस्तूल नेमबाजी स्पर्धेची अंतिम फेरी आज नवी दिल्लीत होणार आहे. वरीष्ठ पुरुष आणि महिला तसंच कनिष्ठ पुरुष आणि महिला अशा चार गटांची अंतिम फेरी होईल. सम्राट राणा, सुरुची सिंग, मनु भाकेर आणि इशा सिंग या पदकविजेत्या नेमबाजांचा भारतीय संघात समावेश आहे.

**क्रिकेट**

19 वर्षांखालील मुलांच्या निर्धारित षटकांच्या विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात पहिला उपांत्य सामना होणार आहे. या सामन्यातील विजेता संघ शुक्रवारी इंग्लंडच्या संघासोबत अंतिम सामन्यात खेळेल.
पहिल्या उपांत्य सामन्यात काल इंग्लंडनं ऑस्ट्रेलियाचा 27 धावांनी पराभव केला.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.